# भुसावळ नगर परिषद, भुसावळ

सूचि - ड

*उपविधी नं. ६.६.१*

## प्रारंभ प्रमाण पत्र बांधकाम परवाना

*महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५/६९ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अनुसार.*

प्रति,
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)**
**महाशय,**

वार्ड क्रमांक -- मधील -- रस्त्यावरील / गल्लीतील घर क्रमांक -- नगरभुमापन क्रमांक **साकेगांव** शिवारातील सर्व्हे क्रमांक **३००/१ब** नगररचना योजना भुसावळ क्रमांक -- मधील अंतीम भुखंड क्रमांक -- मधील भुखंड क्रमांक **१५,१६,१७,१८** मध्ये विकास करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५/६९ अनुसार प्रारंभपत्रास मंजुरी देण्याबाबत/ महाराष्ट्र नगरपरिषदा,नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६६ चे कलम १८९अन्वये बांधकाम करण्यासाठी बांधकाम परवान्यास मंजुरी देण्याबाबतच्या आपला अर्ज क्र.**१२३** दिनांक-**१३-६-२०१४** अर्जात संदर्भात आपणांस खालील अटीवर प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवाना देण्यात येत आहे.

१) रस्त्यापासुन हटवुन बांधकाम करण्याच्या नियमांच्या अंमलबजावणीमुळे खुली सोडलेली जागा सार्वजनिक रस्त्याचा भाग म्हणुन राहील.

२) वापर परवानगी घेतल्याशिवाय कोणतेही नविन इमारतीची वा तिच्या वापर अगर उपभोग घेता येणार नाही. परवानगी न घेता चालु केल्यास महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९३(३) प्रमाणे कायदेशीर कार्यवाही करणेत येईल .

३) हे प्रांरभ प्रमाणपत्र / बांधकाम परवाना दिल्यापासुन एक वर्ष वैध राहील.

४) आपल्या मालकी हक्कात नसलेल्या जमिनीवर आपंणास बांधकाम करता येणार नाही.

५) मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडून बिनशेती परवानगी घेतल्याशिवाय बांधकामास सुरुवात करु नये.

D-B

६) घरातील खोलीचे कमीत कमी बाहेरच्या एका बाजुस वायुविजनची सरळ सोय असावी व त्याचे प्रमाण खोल्याचे जमिनीच्या क्षेत्रफळाच्या एक दशांश पेक्षा कमी नसावे.

६) अ अर्जदार यांनी सादर केलेली माहिती खोटी अथवा दिशाभुल करणारी असल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात यावी.

७) घराची प्रत्येक खोली तळ जमिनीपासुन छताचे खालचे पर्यंत कमीत कमी २.७५ मि.उंचीची असली पाहिजे.

८) घराची रहिवासाची खोली ९.०० चौ.मी. पेक्षा कमी असता कामा नये. खोलीची एक बाजु कमीत कमी २.४ मी पेक्षा कमी असता कामा नये.

९) सदरहु परवानगी दुसरे कोणाचे खाजगी हक्कात बाधा येणार नाही, अशा शर्तीवर दिली असुन तुमचे बांधकामाबाबत दुस-या कोणाच्या तक्रारी आल्यास त्यांची जबाबदारी तुमचेवर राहील .

१०) प्रत्येक खोलीत स्वच्छ हवा येण्याकरता व खराब हवा बाहेर जाण्याकरता व्हेन्टीलेटर शक्य तेवढयाचा उंच जागी उपविधीतील तरतुदी प्रमाणे ठेवावे .

११) घराचे संडास आणि बाथरुमचे सांडपाणी नगरपालिकेच्या गटारित सोडावे. नगरपालिकेची गटार जवळपास नसल्यास तुमचे हद्दीत सोकपित तयार करुन त्यात सांडपाणी सोडावे.

१२) घराचा अगर छपराचा कोणताही भाग सार्वजनिक रस्त्यावर अगर गटारीवर येता कामा नये.

१३) छपरावरील पावसाचे पाणी जाण्यास निमगोळ पन्हाळ १०.०० से.मी. व्यासाच्या नळ नग दोन गटारीपर्यंत लावुन गटारीत पाणी पडेल अशी तजवीज करावी.

१४) पायखान्याचे बांधकाम पुर्ण केल्याशिवाय इमारतीचा वापर करणेची परवानगी दिली जाणार नाही.

१५) प्रत्येक टप्याचे वेळी बांधकाम सुरु करणे पुर्वी कमीत कमी २४ तास अगोदर तपासणी करीता वेळ व तारीख आमचेकडे कळवावी.

१६) जोत्याचे बांधकाम पुर्ण झालेवर लेखी कळवावे. त्याशिवाय पुढील बांधकामास सुरुवात करता कामा नये.

१७) सदर बांधकाम इ. पोल, तारा, पाईप,टेलिफ़ोन पोल, अगर तारा यांचा अडथळा झाल्यास ह्याचे खर्चाची जबाबदारी तुमचेवर राहील.

१८) वरील अटीपैकी कोणतीही अटीचा भंग झालेस दिलीली बांधकाम परवानगी रद्द झाली आहे. समजण्यात येईल. बांधकाम बेकायदेशिर आहे असे समजुन म.न.न.व. औ.अ. १९६५ व म. नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

१९) भुखंडाच्या हद्दीत कमीत कमी पाच झाडे लावावीत.

२०) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.एफ़.ए.आर.१०२००४/१६०/प्र.क्र.२७/नवि - २०, दि.२७-०२-२००४ मधील निर्देशानुसार सदर बांधकामाचे साहित्यात औष्णीक विद्युत केंद्र निर्मित फ़्लाय ॲश आधारित साहित्य वापरावे लागेल.

२१) इमारतीचे छतावर परिसरात जमा होणारे पाणी भुमिगत हौदामध्ये अथवा विहीरीत जमा करावे. किंवा ते पाणी जमीनीत मुरेल अशी व्यवस्था करावी तसेच वरीलप्रमाणे व्यवस्था न केल्यास भोगवटा परवानगी दिली जाणार नाही.

२२) महाराष्ट्र शासनांचे निर्देश क्रमांक डी सी आर/१०९४/२८२९/ नवि - ११ मंत्रालय मुंबई दिनांक - १८.११.२००४ नुसार व्ही आय एस स्पेशीफ़िकेशन नं.आय एस १२९३३ प्रमाणे सोलर असीटेन्ट वॉटर सिस्टीम बसविणे आवश्यक राहील.

२३) सदर प्रकरणात प्रस्तावित बांधकाम नकाशांना मंजुरीची शिफ़ारस करतांना अर्जदाराने प्रकरणासोबत दाखल केलेले मालकी हक्काचे कागदपत्रे ग्राह्य धरण्यात आलेले आहेत. सदर कागदपत्रे भविष्यात दिशाभुल करणारे आढळुन आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

२४) **साकेगांव** शिवारातील सर्व्हे क्रमांक **३००/१ब** चे एकुण क्षेत्रफ़ळ **२४१००.०० चौ.मी.** यापैकी त्यातील भुखंड क्रमांक **१५,१६,१७,१८** चे एकुण क्षेत्र **५००.०० चौ.मी.** जागेपैकी सोबतचे नकाशात **लाल रंगाने दुरुस्ती केल्याप्रमाणे** प्रत्येकी भुखंडावर **४९.३०४ चौ.मी.** जागेवर **रहिवास** वापरासाठी **तळमजला** बांधणे. **२८.९९ चौ.मी.** जागेवर **रहिवास** वापरासाठी **पहिला मजला** बांधणेची परवानगी. सोबतचे नकाशात दाखविल्याप्रमाणे जागा खुली सोडावयाचे शर्तीवर खुल्या सोडावयाचे जागेवर कोणतेही बांधकाम करणार नाही, अशा शर्तीवर **सुधारीत** परवानगी दिली आहे.

**प्रारंभ प्रमाणपत्र व**
**बांधकाम परवाना क्रमांक - १२३**

**दिनांक - २८/ ११/२०१४**

Bhusawal Municipal Council Bhusawal * भुसावळ नगरपरिषद भुसावळ

**मुख्याधिकारी,**
**भुसावळ नगर परिषद, भुसावळ**